Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January -2019

SPECIAL ISSUE-

## Reformation in the Age of Shivaji

## शिवकाळातील सुधारणा



**Executive Editor:**
Prof. Virag Gawande
Director,
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Guest Editor**
Dr.Anil N. Thakre
Hod-History
Shri Gadge Maharaj Mahavidyalaya,
Murtizapur. Dist -Akola [M.S.]

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

15/2019

RESEARCH JOURNEY

MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by TapScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 6.261, (GIF) –0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
January 2019

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | मराठा सत्तेच्या उभारणीत मुस्लीम आणि दलितांचे योगदान | प्रा. पी. ए. टाले | 5 |
| 2 | शिवरायाचा स्त्री विषयक दृष्टिकोन | डॉ. शारदा बंडे | 8 |
| 3 | शिवकालीन ग्रामीण प्रशासन व्यवस्था | प्रा. संदीप व्ही. भुरले | 11 |
| 4 | शिवकालीन महसूल पध्दती ऐतिहासिक अध्ययन | डॉ. नितीन व. चांगोले | 15 |
| 5 | छत्रपती शिवाजी महाराजाची लष्करी व्यवस्था व सुधारणा | प्रा. भोसले राजेसाहेब | 18 |
| 6 | शिवकालीन शेतीविषयक सुधारणा | सहा. प्रा. राजेंद्रसिंग हिरासिंग देवरे | 21 |
| 7 | जनकल्याणकारी, प्रजाहितदक्ष, द्रष्टाराजा – छत्रपती शिवाजी महाराज | डॉ.ओमप्रकाश बोबडे | 27 |
| 8 | मराठेकालीन सती प्रथा-एक अभ्यास | प्रा.गंगणे रतन व्यंकटराव | 30 |
| 9 | शिवाजी महाराजांची गनिमी कावा युध्दपध्दती: विशेष प्रसंग अफजलखान भेट | प्रा. डॉ. कैलास जे. गायकवाड | 33 |
| 10 | शिवकालीन प्रांतिक व स्थानिक न्यायव्यवस्था | श्री. हरिदास मंगरू वाकुलकर | 36 |
| 11 | शिवाजीच्या लष्करी व्यवस्थेची वैशिष्टये | प्रा.डॉ. रामधन उ.हिरे | 40 |
| 12 | शिवकालीन गड-कोट अथवा किल्ले व्यावस्थापणातील छत्रपती शिवरायांचीभुमिका एक अभ्यास | डॉ.इंगळे चत्रभुज बंकटराव | 42 |
| 13 | मराठी साम्राज्याच्या उभारणीमध्ये शिवाजी महाराजांच्या परराष्ट्र धोरणाचे महत्व | प्रा.डॉ.संतोष एस.इंगोले | 46 |
| 14 | शिवकालीन जलव्यवस्थापन आणि आजची परीस्थिती | प्रा. डॉ. सिद्धार्थ भ. जाधव रूपेश राहूल तागडे | 48 |
| 15 | छत्रपती शिवाजी राजांच्या स्त्री - विषयक दृष्टीकोण -एक ऐतिहासिक विश्लेषण | प्रा.डॉ.पी.आर.जुनघरे | 53 |
| 16 | शिवकालीन आरमार : एक अभ्यास | प्रा.डॉ.कदम संतोष तुकाराम | 56 |
| 17 | शिवरायांची युध्दनिती | प्रा.डॉ.कोकीळा अ. गांवडे | 61 |
| 18 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या शेती सुधारणा | प्रा. एस.जी. कुळकर्णी | 64 |
| 19 | विजापूरच्या आदिलशाहीसोबत शिवाजी महाराजांची युध्दनीती | प्रा. डॉ. निलय देशमुख | 67 |
| 20 | शिवरायांचे अष्टप्रधानमंडळ | प्रा. डॉ. श्रीहरी रंगनाथराव पितळे | 71 |
| 21 | शिवजीचे आरमार व शिस्त | प्रा. प्रतिमा ना. वानखडे | 74 |
| 22 | शिवकालीन औद्योगिक व व्यापारी केंद्राचे ऐतिहासिक अध्ययन | प्रा. प्रसन्न बगडे | 77 |

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) - 0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
January 2019


| | | |
|---|---|---|
| 23 | शिवकालीन ''दुष्काळ'' व्यवस्थापन आणि उपाययोजना प्रा.डॉ.संदीप भिमराव डोंगरे | 81 |
| 24 | छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासन व्यवस्था डॉ. माधुरी एन. देवतळे | 84 |
| 25 | शिवाजी महाराजांची लष्करी व्यवस्था डॉ. प्रदिप शामरावजी ढोले | 88 |
| 26 | शिवकालीन न्यायव्यवस्था ज्योती व्हि. कवठे (रणदिवे) | 91 |
| 27 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या शेती विषयक सुधारणा **प्रा. दिनकर मोहनराव रणदिवे** | 96 |
| 28 | शिवकाळातील प्रशासकीय सुधारणा प्रा. पंढरी गंगाधर मोरे | 99 |
| 29 | धर्मसहिष्णू राजा : शिवछत्रपति **प्रा.डॉ. शहनाज शेख** | 102 |
| 30 | मराठेकालीन गड किल्ल्यांचे महत्व व गडांवरील प्रशासन व्यवस्था डॉ नितीन उल्हासराव सराफ, | 105 |
| 31 | छत्रपति शिवाजी महाराजांची आरमार व्यवस्था **प्रा.डॉ. रफीक शेख** | 109 |
| 32 | शिवकालीन न्यायदान पध्दती : मजलिस प्रा.डॉ. सिध्दराम किशन मुंडे | 112 |
| 33 | शिवकाळातील किल्ले प्रशासन व मराठ्यांच्या स्वातंत्र्य लढ्यात किल्यांची भूमिका प्रा. गजानन लिंबाराव सोडनर | 116 |
| 34 | शिवकालीन कृषी विषयक सुधारणांचे ऐतिहासिक अध्ययन **प्रा. डॉ. सुरेश ल. पंडित** | 121 |
| 35 | शिवकाळ : स्त्रियांची स्थिती प्रा.डॉ. भाऊराव रामेश्वर तनपुरे, | 123 |
| 36 | शिवाजी महाराजांचे स्त्रीविषयक धोरण एक अभ्यास डॉ. ठकसेन दा. राजगुरे | 127 |
| 37 | शिवकालीन अष्टप्रधान मंडळ **प्रा. दिपक हरी लहासे** | 130 |
| 38 | शिवकालीन न्यायव्यवस्थेतून प्रजासत्ताक राज्यपद्धतीची स्थापना **प्रा. विजय पुंडलिक साळुंखे** | 133 |
| 39 | शिवाजी महाराजांचा सुधारनेबद्दलचा व्यापक दृष्टीकोण **डॉ. विजयसिंग किसनराव पवार** | 136 |
| 40 | शिवाजी महाराजाची न्यायव्यवस्था प्रा. डॉ. सिध्दार्थ शिवाजी वाठोरे | 138 |
| 41 | छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा ज्ञानेश्वर दा. वारंगे | 141 |
| 42 | शिवकालीन शेतीविषयक सुधारणा प्रा.डॉ.सतीश रा.महल्ले | 144 |
| 43 | शिवकालीन न्याय प्रशासन प्रा. गजानन लिंबाराव सोडनर | 148 |
| 44 | शिवकालीन दुर्गव्यवस्थापन–एक विश्लेषन प्रा. डॉ. माया म. वानखडे | 153 |
| 45 | शिवाजी महाराजांचे आरमार व्यवस्था **प्रा.डॉ.अमोल बोरकर** | 163 |
| 46 | शिवाजी महाराजांची प्रशासन व्यवस्था - एक दृष्टीक्षेप **डॉ. ज्ञानेश्वर आर. यावले** | 165 |
| 47 | प्रा शिवाजी महाराजांची लष्करी व्यवस्था शिल्पा शेटे | 168 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) –0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
January 2019

# छत्रपती शिवाजी राजांच्या स्त्री - विषयक दृष्टीकोण -एक ऐतिहासिक विश्लेषण

प्रा.डॉ.पी.आर.जुनघरे (इतिहास विभाग प्रमुख)
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञानमहाविद्यालय मेहकर. जि. बुलडाणा

**प्रस्तावणा:-**

भारतात अनेक राजे झाले त्यांनी अलौकिक पराक्रम गाजवून साम्राज्य उभी केली. परंतु छत्रपती शिवाजी राजांना जी लोकप्रियता मिळाली ती इतरांना क्वचितच मिळाली असेल. या राजाने स्वकर्तृत्वावर राज्य उभे केले मराठी माणसाची अस्मिता जागविली गोरगरीब बहुजनसमाजाला व्यवस्थेत सामावून घेतले पण त्यापेक्षाही शिवाजीराजांचे सर्वात मोठे आणि महत्वाचे कार्य कोणते असेल तर ते म्हणजे जातीप्रथा व स्त्री दास्य हयाला दिलेले जबरदस्त हादरे हे होय. हजारो वर्षापासून अबाधित असणाऱ्या प्रथा परंपरांना हात लावण्याची हिम्मत कोणत्याही भारतीय राजाने केली नाही. पण तळागाळातल्या समाजाला न्याय देण्याचे क्रांतीकारी कार्य शिवाजी राजाने केले . त्यामुळे आज ही समाजमनावर शिवाजी राजाचा प्रभाव टिकून आहे. त्याचबरोबर ज्या काळात भारतात स्त्रीची किंमत एक उपभोग्य वस्तु अशी होती . त्या काळात शिवाजी राजाचा स्त्री विषयक दृष्टीकोण किती पुरोगामी होता हे स्पष्ट करणे प्रस्तुत शोध निबंधाचा हेतू आहे.

**१) शिवपूर्व काळातील शासकांचा स्त्रीविषयक दृष्टीकोण :-**

शिवपूर्व काळात भारतात प्रामुख्याने इस्लाम सत्ताधिशांची सत्ता होती. इ.स १२०६ मध्ये भारतात मुस्लीम सत्तेची स्थापना झाली एका हातात कुरान व दुसऱ्या हातात तलवार घेवून इस्लाम धर्माचे अनुयायी धर्मप्रसारासाठी ऐकामागून एक प्रदेश हस्तगत करीत भारतात दाखल झाले. मुसलमान सत्तेच्या आगमना बरोबर त्याच्या प्रथा परंपरा सुध्दा दाखल झाल्या .त्यापैकी एक गुलाम प्रथा की ज्या प्रथेमुळे पुढील काळात स्त्री च्या जीवनात फरफट निर्माण झाली मुसलमान सत्ताधीश युध्दात विजय संपादन केल्यानंतर पराभुत झालेल्या शासकांच्या स्त्रीयांना आपल्या जनानखान्यात भरती करीत असत. सुलतान कुतूबउद्दीन ऐबकाने इ.स. ११९५ मध्ये गुजरातवर स्वारी करून २० हजार स्त्री पुरूषांना गुलाम बनविले .सूलतान अल्लाउद्दीन खिलजीने आपल्या प्रत्येक स्वारीत हिंदु राज स्त्रियांशी विवाह करून आपला जनानखाना वाढविला . देवगीरीचा शासक रामदेवरायची स्वरूप सुंदर कन्या जिताई, गुजरातचा शासक करनसिहांची राणी कमलादेवी, चितोंडची राणी पद्मीनी अशी अनेक दाखले देता येतील. स्त्री-पुरूषांना गुलाम करून त्यांचे शोषन करण्याचा छंद फिरोजशहा तुघलकाला सुध्दा होता. चंगेजखान नावाचा प्रसिध्द शासक मरण पावल्यानंतर त्यांचे सेवेसाठी ४० कुमारीकांना ठार मारून स्वर्गात पाठविण्यात आले. थोडक्यात सुलतान शाहीच्या काळात 'स्त्रीया पुरूषासाठीच अल्लाहने निर्माण केल्या' असा समज उराशी बाळगून त्यांच्याशी व्यवहार केला जात होता.

इ.स १५२६ मध्ये भारतात मुगलवंशाची सत्ता प्रस्थापीत झाली. या काळात सूध्दा शासकांचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलेला दिसून येत नाही. प्रसिध्द इटालियन प्रवाशी निकोलाय मनुचीच्या मते 'महालात सर्वाची सेवा करण्यासाठी विभीन्न जातीच्या २००० स्त्रीया होत्या' मुगल सम्राटाच्या जनानखान्यात ५००० पर्यत स्त्रीया असत. एखादया गावाशेजारी लष्कराची छावणी पडली की, गावात वाऱ्यासारखी बातमी पसरून लोक हवालदिल होत असत . आपल्या तरूण मुली व सुना लपवून ठेंवल्या जात होत्या काही जन घरेदारे सोडून जंगलात अब्रू वाचविण्यासाठी पळून जात असत. एखादा फाटका सैनिक गावात प्रवेश करून सर्वासमक्ष सुंदर दिसणाऱ्या तरूणीला उचलुन नेत असे किंवा गावाचे पाटीलाकडे सुंदर दिसणाऱ्या स्त्रीची स्पष्ट मागणी करीत असे. तेव्हा गावकरी नाखुषीने एखादा स्त्रीचा बळी देवून इतर स्त्रियांची अब्रू वाचवत होते. असे भयानक चित्र मुगल काळात होते.

**२) शिवाजी राजाचा स्त्री विषयक दृष्टीकोण:-**

शिवाजी राजानी अफजलखानाचे पोट कसे फाडले शाहीस्तेखानाची बोटे कशी तोडली इत्यादी प्रसंग रंगवून सांगीतले जातात. अर्थात हे प्रसंग कमी महत्वाचे आहेत असे नाही. पण हयापेक्षाही शिवाजी राजांचे सामाजिक धोरण कसे होते हे सांगणे आज काळाची गरज आहे. परस्त्री मातेसमान लेखनारा, शत्रुपक्षाकडील स्त्रीयांचा आदर करणारा, धर्मग्रंथानी स्त्रियांवर लादलेला बंधनाना झुगारून देणारा शिवाजी राजा किंवा त्यांचे कतृत्व फारसे प्रकाश झोतात आले नाही.त्यामुळे पुढील उदाहरणांच्या आधारे शिवाजी राजांच्या क्रांतीकारी विचारांचा मागोवा घेता येईल.

**i) स्त्रीयांच्या अब्रुचे रक्षण करण्याचे सैनिकांना सक्त आदेश:-**

ज्या काळात बादशाही सरदार,वतनदार स्त्रियांना पळवून नेण, अब्रु लुटून जनानखान्यात कोंबने, गुलाम करने असे हीन प्रकार करीत होते त्याकाळात राजांनी आपल्या सैनिकांना स्त्रियांच्या अब्रुचे रक्षण करण्याचे सक्त आदेश दिले. तसेच त्याकाळात हिंदु



Scanned by TapScanner

शासक सुध्दा युध्दमोहीमेवर जात असतांना जनानखाने, बटकीनी , कलावंतीनी व नृत्यांगना असा प्रचंड लवाजमा सोबत नेत असत परंतु युध्दामध्ये पराभव झाल्यानंतर हया सर्व स्त्रियांचे शत्रुपक्षाकडून विटंबना होत होती . त्यामुळे शिवाजी राजांनी स्त्रियांची संभाव्य विटंबना टाळण्यासाठी आपल्या सैनिकांना धर्मपत्नी व इतर स्त्रियांना सोबत घेवू नये असे आदेश दिले. त्याच बरोबर शत्रुपक्षाकडील स्त्रियांना सुध्दा कोणत्याही प्रकाराचा त्रास देवू नये अशा प्रकारचे नियम घालुन दिले. नियमाचे उल्लघन करणाऱ्या सैनिकास शिक्षा फर्माविण्यात आल्या त्यामुळे शिवरायावर टिका करणारा मोगल इतिहासकार खाफीखान सुध्दा त्यांच्या स्त्रिविषयक धोरणाची प्रशंसा करतांना दिसतो.

**ii) राज्यकर्त्या शत्रु स्त्रियांचा सन्मान :-**

'शत्रु हा शत्रुच असतो ती स्त्री असो अथवा पुरूष ' असी मध्ययुगीन काळातील राज्यकर्त्याची मानसिकता होती. परंतु शिवरायांचे धोरण काळानरूप नसून काळाच्या पुढचे होते. शिवरायांनी दक्षिण माहिमेत सपुर्ण कर्नाटक प्रांत जिंकला बेदनुर येथे त्यावेळी एक विधवा स्त्री राज्य करीत होती. परंतु महाराजांनी तिला कोणताही उपद्रव दिला नाही. तसेच सुरत लुटीवरून परत येत असतांना माहुरच्या रायबाघन नावाच्या योध्दा स्त्रीने महाराजांना अडविले उंबरजच्याखिडीत लढाई झाली त्यामध्ये तिचा पराभव झाला. परंतु राजांनी तिला माफ करून त्या योध्दा स्त्रीचा मानसन्मान करून वस्त्रअंलकारसह तीला पाठवून दिले.

**iii) काही महत्वपुर्ण प्रसंगातील शिवाजीराजांची भुमीकाः-**

मध्ययुगीन काळातील राजकारण म्हणजे 'ज्यांच्या हातात जोर तो शिरजोर' या पठडीतील होते. युध्दात कोणताही विधीनिषेध पाळला जात नव्हता. आपला हेतु साध्य करण्यासाठी शत्रुकडील व्यक्ती ओलीस ठेवणे , एखादयाची बायको स्वतःसाठी मागणे असे प्रकार सर्रास चालत होते. तत्वापेक्षा तलवारीला जास्त महत्व होते. त्या पार्श्वभुमीवर काही प्रसंगातील शिवाजी राजांची भुमीका उल्लेखनिय आहे.

**●रांझेगावच्या पाटलांचे बलात्कार प्रकरण :-**

रांझेगावच्या बाबाजी भिकाजी पाटील या वतनदाराने एका गरीब शेतकऱ्याच्या मुलीला सर्वा समक्ष उचलुन नेले व तिच्यावर अत्याचार केले. अब्रु गेलेल्या जीवनापेक्षा मेलेले बरे म्हणून त्या मुलीने जीव दिला जिजाऊ माँ साहेबांना ही बातमी समजली त्यांनी आरोपी पाटलाला दरबारात हजर राहण्याचे आदेश देवून संबंधीत प्रकरणाचा न्यायनिवडा बाल शिवबांकडे सोपविला, राजांनी बाबाजी भिकाजी पाटलाची पाटीलकी जप्त करून त्याचे हातपाय तोडण्याची शिक्षा दिली. ज्या हाताने स्त्रीची अब्रु लुटली ते हात शाबुत ठेवायचे नाहीत. शिवबाच्या या निर्णयामुळे स्वराज्यात अश्चर्य निर्माण झाले.

**●सेनापती सेखुजी गायकवाडला शिक्षाः-**

स्त्रीयांचा आदर सन्मान सर्वानी केला पाहिजे असी शिवाजी राजांची कायम भुमीका होती स्त्रीच्या अब्रुवर घाला घालणाऱ्या शिक्षा झालीच पाहिजे हे त्यांचे धारण होते. हे स्पष्ट करणारी असीच एक घटना इ.स.१६७८ मध्ये घडली सेखुजी गायकवाड नावाच्या सेनापतीने विजयाच्या उन्मादात कर्नाटक प्रातांतील बेलवडीची राणी सावित्रीबाइ देसाई हिच्यावर बलात्कार केला. इतर सैनिकांनी सुध्दा सेनापतीचे अनुकरण करून स्त्रीयांवर अत्याचार केले या प्रकराणाची माहिती शिवाजी राजांना झाल्या नंतर त्यांनी सेखुजी गायकवाडचे डोळे काढून उर्वरीत सैनिकांचे हात कलम केले. तसेच सावित्रीबाई देसाई यांना वस्त्र व अलंकार देउन गौरविले.

**●सतीप्रथा लाथाडनारा राजा :-**

मध्ययुगीन काळात भारतात सतीप्रथा प्रचलित होती. बेदनूरच्या स्वारीवरून परत येत असतांनी २३ जानेवारी १६६४ रोजी शहाजीराजांचा मृत्यू झाला त्यानंतर तत्कालीन प्रथेप्रमाणे राजमाता जिजाऊ सती जाण्यासाठी सिध्द झाल्या. परंतु शिवाजी राजांनी राजमाता जिजाऊला सती जाण्यापासून परावृत्त केले.

**●गुलामगिरी प्रथेला विरोध :-**

मध्ययुगीन काळात स्त्रीयांचा गुलाम म्हणून व्यापार होत होता. राजांनी या प्रथेला आळा घातला. डचा बरोबर झालेल्या तहामध्ये त्यांना स्पष्टपणे बजावले 'मुसलमानी राजवटीत तुम्हाला स्त्री पुरूषांना विकत घेण्याची परवानगी होती परंतु माझ्या राज्यात अशा अमानवी प्रथेला मान्यता नाही.'

**●राजाराम पालथा जन्मला स्त्री दोष नाही :-**

राणी सोयराबाई राजधानी रायगडावर प्रसुत होवून पुत्ररत्न झाले. परंतु बाळ पालथे जन्मले तत्कालीन पंडिताच्या मते हा अशुभ संकेत आहे. परंतु महाराजांनी अंधश्रध्देच्या आहारी न जाता त्या धर्म मार्तडांना ठणकावून सांगीतले राजाराम पालथा

जन्मला आला याचा अर्थ तो जुलमी मुगलांची शाही पालथी घालण्यासाठी.' तसेच पुढे राज्यभिषेक समारंभ प्रसंगी राणी सोयराबाईला पट्टराणीचा दर्जा दिला.

**●धाडसी वृत्तीच्या हिरकणीचा गौरव:-**

रायगडाच्या पायथ्याशी राहणारी हिरकणी नावाची स्त्री मोठ्या हिम्मतीने गड उतरून खाली आली. ही वार्ता महाराजांना माहिती झाल्यानंतर त्यांनी तिचा गौरव केला. त्याचबरोबर त्या ठिकाणी बांधलेल्या बुरूजाला हिरकणीचा बुरूज असे नाव दिले या वरून शिवाजी राजांच्या स्त्री विषयक धोरणाची प्रचिती येते.

**●शिवाजी राजांची स्त्री विषयीच्या आदराची भावना धर्मातीत :-**

मोगल सैनिक मराठी मुलुखावर स्वारी करीत असतांना स्त्रीयावर अन्याय आत्याचार करीत असत परंतु मोगलाशी प्रत्युत्तर देत असतांना राजे कमालीचा संयम राखुन मुस्लीम स्त्रीयांना सन्मानाने वागवित असत. त्यामुळे अनेकदा शत्रुनी स्त्री वेष धारण करून पलायन केले. त्याच बरोबर मराठा स्त्रीवर अन्याय अत्याचार केल्या नंतर जी शिक्षा गुन्हेगारांला दिली जात होती तीच शिक्षा मुस्लीम स्त्रीवर अन्याय करणाऱ्या गुन्हेगारांला सुध्दा भोगावी लागत होती. थोडक्यात शिवाजी राजाचे स्त्री विषयाचे धोरण धर्मातीत होते.

**३) छत्रपती शिवाजी राजांच्या स्त्री विषयक धोरणाची जननी राजमाता जिजाऊ:-**

शिवाजी राजांच्या स्त्री विषयक विचारसरणीची संपुर्ण जडणघडण राजमाता जिजाऊच्या मार्गदर्शनाखाली झाली होती.'मुल जन्माला आल्यानंतर त्याची पहिली गुरू आई असते' हे नव्याने सांगण्याची गरज नाही शिवरायांच्या प्रत्येक पैलुवर अखेर पर्यंत मातोश्री जिजाऊची छाप होती. हे शिवचरित्रावरून स्पष्ट होते. शिवप्रदिप या ग्रंथाचे ग्रंथकार पटवर्धन लिहतात. 'स्वराज्य स्थापन करावयाचे हा मायलेकरांचा संकल्प होता.' रियासतकार सरदेसाई च्या मते 'शिवरायाचा हुड स्वभाव पाहुन त्याला योग्य वळण दिले असता आपले व कुळाचे नाव काढील असा विश्वास जिजाऊला वाटु लागला' न्या. रानडे यांनी सुध्दा शिवरायांच्या सर्व धोरणाचे श्रेय जिजाऊला दिले तसेच मध्ययुगीन स्त्रीयांच्या दयनिय अवस्थेची जाणीव जिजाऊना चांगलीच होती. स्वतः जिजाऊची जाऊ नाशिकवरून महाबतखानाने पळून नेली होती. अबला स्त्रीयांच्या आर्त किंकाळया राजमाता जिजाऊच्या संवेदनशील मनाला जाउन भिडत होत्या. शतकानु शतकापासून असे घडत होते. परंतु अन्यायाचा प्रतिकार करून स्त्रीयांच्या अब्रुचे रक्षण करणारा एकही मायचा लाल समोर येत नव्हता. त्या पार्श्वभुमीवर राजमाता जिजाऊने शिवाजी राजांवर योग्य संस्कार करून त्यांना स्त्रीवादी राजा बनवून स्त्रीयांच्या अब्रुंचे रक्षण केले.

**सारांश :-**

भारतात एकापेक्षा एक पराक्रमी राजे होवून गेले. त्यांनी प्रचड मोठी साम्राज्य निर्माण केली. काहींची धग अजुनही कायम आहे तर काहींना काळाचे ओघात इतिहास विसरला. साम्राज्य उभी राहत असतात आणि कोसळत असतात पण दिर्घकाळ अथवा कायम टिकत असतात ते केवळ तत्वे आणि व्यक्तीचे आदर्श. शिवरायांनी तत्वाची पेरणी केली, काही आदर्श मराठी माणसांची अंगी बानवून दिले. महाराष्ट्रात त्या तत्वांची व आदर्शाची चुणूक आजही दिसून येते. स्वराज्य स्थापनेच्या कार्याबरोबर प्रचलित समाजव्यवस्थेच्या विरोधात जावून अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले . स्त्रीचे कार्यक्षेत्र चुल व मुल आहे, स्त्री एक उपभोगाची वस्तु आहे. अशी समजुत असणाऱ्या काळामध्ये शत्रुच्या स्त्रियांचा आदर करणारा स्त्री जातीचा सन्मान करणारा शिवाजी राजा एक महान समाजसुधारक होता. एका महान समाजसुधारकांची दृष्टी त्यांच्याकडे होती.

**संदर्भ ग्रंथ:-**

१) कुलकर्णी खरे , मराठयांचा इतिहास खंड १ , कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे-३०
२) सरदेसाई गोंविद सखाराम , मराठी रियासत खंड १ , पॉप्युलर प्रकाशन मुंबई.
३) सरदेसाई गोंविद सखाराम , मुसलमान रियासत खंड १ , पॉप्युलर प्रकाशन मुंबई .
४) प्रा. दिनेश मोरे, शिवरायांचा स्त्री विषयक दृष्टीकोण , चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
५) मढवी काशिनाथ , जगातील सर्वोत्तम राजा छत्रपती शिवाजी, संस्कृती प्रकाशन,पुणे
६) संपादक काकडे सिताराम , छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ग्रंथ, कुळवाडी भुषण राजा शिवाजी, पार्वती प्रकाशन अहमदनगर .

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana
330



Scanned by TapScanner